**उपरोक्त संस्थेच्या कार्यकारिणी व सर्व निमंत्रित सभासदांची सभा, संस्थेच्या कार्यालयात रविवार दिनांक: ३०/०१/२०२२ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. अध्यक्ष श्री. ह्यांचा अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.**

वरील सभेस कार्यकारिणी मंडळाचे पदाधिकारी व निमंत्रित सभासद मिळून, एकूण ३७ सदस्यांनी आपली उपस्थिती दाखवली.

**विषय क्र. १. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (पीएमसी) यास कडून प्राप्त पुनर्विकास प्रकल्प अहवाल बद्दल सविस्तर चर्चा व सदर अहवाल मंजूर करणे बाबत.**

संस्थेचे अध्यक्ष श्री. अरुण पाटील यांनी श्री. मनिष जाधवसाहेब संस्थेचे कायदेतज्ञ ह्यांना विनंती केली की त्यांनी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (पीएमसी) यांस कडून प्राप्त पुनर्विकास प्रकल्प अहवाल बद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना द्यावी. श्री. मनिष जाधव साहेबांनी उपस्थितांना रितसर पुनर्विकास प्रकल्प अहवाल सर्वांना प्राप्त झाले का? ह्यांची विचारणा केली त्यास उपस्थितांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यावर त्याचे वाचन करून माहिती सादर केली, माननीय अध्यक्ष श्री अरूण पाटिल यांनी सदर पुनर्विकास प्रकल्प अहवाला बाबत काही शंका, त्रुटी किंव्हा सूचना असल्याबाबत विचारणा केली असता उपस्थित सभासदांनी कोणतीही शंका त्रुटी किंव्हा सूचना नसल्याबाबत सांगितले, तदनंतर पुनर्विकास प्रकल्प अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र.२. विकासक यांना आपल्या संस्थेच्या इमारतींचे पुनर्विकास करणेकामी तसेच कॉर्पस फंड किंव्हा कार्पेट एरिया यापैकी एक बाब (न बदलणारी) कायम ठेवून नामांकित तज्ञ व अनुभवी विकासकांकडून स्पर्धात्मक निविदा प्राप्त करण्या करीता सदर मसूदा मंजूर करून वर्तमापत्राद्वारे जाहिरात प्रसिद्ध करणे बाबत निर्णय घेणे.**

संस्थेचे सचिव श्री. महेश गुजर यांनी उपस्थितांना सकारात्मक मत मांडण्याची विनंति केली व खालिल प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. नामांकित तज्ञ व अनुभवी विकासकांकडून स्पर्धात्मक निविदा प्राप्त करण्या करीता व त्याचा मसूदा तयार करण्याकामी कॉर्पस फंड किंव्हा कार्पेट एरिया यापैकी एक बाब, न बदलणारी असावी ह्या करीता संस्थेच्या सभासदांना विचारणा करण्यात आल्या नंतर कार्पेट एरिया ही बाब कायम ठेवून निविदा मसूदा तयार करण्याचे मान्य केले.

२. विकासकाकडून, अतिरिक्त वाढीव १०% कार्पेट एरिया मागणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

३. विकासकाकडून प्रत्येक सभासदास पर्यायी व्यवस्थे करिता घरभाडे व शिफ्टिंग चार्जेस मागण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

४. विकासकाने सदर संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकास दोन वर्षात करावा, तसेच काही अडचणीमुळे दोन वर्षात न झाल्यास एक वर्षाची वाढीव मुदत देण्याचे ठरविले. जोपर्यंत सदर संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकास पूर्ण होत नाही तो पर्यंत विकासाकडून पर्यायी व्यवस्थेचे भाडे घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

५. सदर, पुनर्विकास प्रकल्पाचा करारनामा (Development Agreement) हा अहस्तांतरित (Non-transferable) असेल असे सर्वानमते ठरवले.

६. विकासकाकडून पुनर्विकास प्रकल्पाबाबत बँक गॅरंटी घेण्याची विनंती केली.

७. सदर, पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदा पॅकेटाची रक्कम हि २०,०००/- (अक्षरी वीस हजार रुपये) नॉन- रिफंडेबल स्वरुपात इच्छुक विकासकाकडून घेण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले आहे.

अश्या प्रकारे निविदेचा मसूदा मंजूर करून, वर्तमापत्राद्वारे जाहिरात प्रसिद्ध करणे बाबतसर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

सचिव श्री महेश गुजर यांनी उपस्थित कार्यकारिणी मंडळ, सभासद तसेच श्री. मनिष जाधव साहेब, ह्यांचे आभार व्यक्त करून सदर सभा तहकूब करण्यात आली.